# ST. XAVIER'S TECHNICAL INSTITUTE, MAHIM

Government Aided Autonomous Minority Institute, Approved by A.I.C.T.E. New Delhi
Mahim Causeway, Mumbai. Pin – 400 016
Phone: 24455937, 24454559; 24451961, 24460359 Fax: +91(22)2445 4482
E-mail: office@xaviertech.com / examination@xaviertech.com


Date: 26th September 2022

## NOTICE

With reference to MSBTE's circular attached herewith :
**Circular for Final Year S22_RE_250820221520 dated 25th August 2022**
**Circular for remedial coaching dated 24th August 2022**
Guidelines of the above circulars shall be followed except the ones which are not applicable to our institute for the conduction of the Re exam of Summer 2022 Term End Examination.

All the final year students who had applied for Summer 2022 term end examination and have backlog of final year or lower semester(s) pending are herby informed to fill the Examination Form for **Re-exam of Summer 2022 Term End Examination** as per the schedule given below.

The examination form filling link shall be available with Mr. Darshan Chavan.

All the students must submit the photocopy of previous semesters mark sheets along with the examination form.

Examinations forms will not be accepted without photocopy of marksheet/s.

Fees for the same are as follows:

| Activity | From | To |
|---|---|---|
| Examination form filling (* normal fees) | 05th September 2022 | 07th September 2022 |

* Examination fees of **Rs. 700/-** per semester to be paid in the accounts section in office.

Examination forms in any case will not be accepted after 07th September 2022.

**Candidates are requested to follow the schedule for payment and submission of examination forms strictly, so as to avoid last minute hassle.**

Sd/-
Dr. S. B. Ghungrad
Principal

Sd/-
Mestry Dipti
Controller of Examinations

CC: Office Accounts HOD Website

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/१५३/१५४

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र. मरातंशिमं/का-५०/Remedial Coaching/२०२२/६२

दिनांक : 24 AUG 2022

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम

राबविणा-या सर्व संस्था तसेच स्वायत्त तंत्रनिकेतने.

विषय :- **संस्थास्तरावर विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक अध्यापन प्रक्रिया** (Remedial Coaching) **राबविणेबाबत**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील उन्हाळी २०२२ च्या परीक्षेचे निकाल जाहिर झालेले आहेत. सदर परीक्षेत काही विद्यार्थी अनुत्तीर्ण झालेले आहेत तर काही विद्यार्थी ऐटीकेटी मिळून पुढील वर्षात गेलेले आहेत. तरी संस्थेतील या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक अध्यापन प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे.

ज्या विषयाची काठिण्यपातळी जास्त आहे, तसेच ज्या विषयात विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण जास्त आहे, अशा विषयाबाबत विद्यार्थ्यांचे concept clear करण्याकरिता व विद्यार्थ्यांची त्या विषयाची आकलन क्षमता वाढविण्यासाठी संस्थेतील संबंधीत अध्यापकांमार्फत उपचारात्मक अध्यापनाची आवश्यकता आहे.

संस्थेने उन्हाळी २०२२ च्या परीक्षेच्या निकालांचे विश्लेषण करावे. ज्या विषयात विद्यार्थी अनुत्तीर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता कशाप्रकारे उपचारात्मक अध्यापन करता येईल याबाबत अध्यापकांची मते जाणून घेऊन उपचारात्मक अध्यापन रचनात्मक पध्दतीने व सातत्याने करणे आवश्यक आहे.

याकरिता उपचारात्मक अध्यापन प्रक्रिया प्रत्यक्ष तास घेऊन, प्रात्यक्षिक घेऊन, व्हिडीओ तयार करुन, शैक्षणिक साहित्य तयार करुन, नोट्स देऊन, E-content तयार करुन, टयूटोरियल घेऊन संस्थास्तरावर राबविण्यात यावी. उपचारात्मक अध्यापनाची अंमलबजावणी करण्याकरिता मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

- ज्या विषयाकरिता उपचारात्मक अध्यापन करणे आवश्यक आहे त्या विषयाची निवड संस्था स्तरावर करावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांना उपचारात्मक अध्यापन करणे आवश्यक आहे अशा विद्यार्थ्यांची संस्थास्तरावर निवड करावी.
- उपचारात्मक अध्यापन शनिवार/रविवार किंवा नियमित वेळापत्रकाव्यतिरिक्त दररोज एक/दोन जादा तासिका घेऊन करण्यात यावे.
- उपचारात्मक अध्यापन करण्यासाठी वेळापत्रक निर्धारित करुन परिपत्रकाद्वारे विद्यार्थ्यांना त्याची माहिती दयावी व संस्थेच्या संकेतस्थळावर वेळापत्रक प्रसिध्द करावे.
- संस्थास्तरावर उपचारात्मक अध्यापन प्रक्रिया राबविण्यासाठी संस्थेतील अनुभवी अध्यापकांची/तज्ञांची समन्वयक म्हणून प्राचार्यांनी नेमणूक करावी.
- उपचारात्मक अध्यापन प्रक्रियेसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य, व्हिडीओ, नोट्स, E-content संस्थेतील अध्यापकांमार्फत तयार करण्यात यावेत.
- काही विषयाचे E-content, व्हिडीओ मंडळाने तयार केलेले आहेत त्याचा वापर आवश्यकतेनुसार उपचारात्मक अध्यापनासाठी करावा.

- एखादया विषयातील काही पाठाची (Chapter) काठिण्यपातळी जास्त आहे, त्या पाठासाठी किंवा संपूर्ण विषयासाठी उपचारात्मक अध्यापन प्रक्रिया राबवावी.
- उपचारात्मक अध्यापनाकरिता विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये.
- द्वितीय वर्षात विद्यार्थ्यांच्या प्रवेशास उशीर होत असल्याने अशा विद्यार्थ्यांसाठी ब्रीज कोर्सेस घेण्यात यावेत. तसेच थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या ITI/MCVC/Vocational विद्यार्थ्यांसाठी Physics, Chemistry, Maths, Drawing इत्यादी विषयाचे ब्रीज कोर्सेस घेण्यात यावेत.
- उपचारात्मक अध्यापनाच्या प्रगतीचा प्राचार्यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा. तसेच विद्यार्थ्यांकडून Feedback घेऊन संबंधित अध्यापकांना याबाबतीत सूचना/मार्गदर्शन करावे.
- संस्थेतील समन्वयकाने उपचारात्मक अध्यापनाची माहिती मंडळाच्या संकेतस्थळावर I Sechme Implementation यामध्ये Teaching Learning Process या Module मध्ये प्रत्येक १५ दिवसानंतर भरावी. सदर Module I Sechme Implementation Institute Login मध्ये उपलब्ध आहे. याबाबतची माहिती भरल्याची खात्री संस्थेच्या प्राचार्यांनी करावी.
- उपचारात्मक अध्यापनाकरिता जे विद्यार्थी उपस्थित राहतील त्यांची हजेरी घेण्यात यावी सदर दस्तऐवज संबंधित अध्यापकांनी जतन करावेत.
- **अंतीम सत्र / वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची त्यांच्या अनुत्तीर्ण असलेल्या विषयाची फेरपरीक्षा सप्टेंबर २०२२ मध्ये होणार असल्याने अशा पात्र विद्यार्थ्यांकरिता संस्थास्तरावर विशेष बाब म्हणून प्राधान्याने उपचारात्मक अध्यापनावर ( Remedial Coaching) वर जास्त भर देण्यात यावा. परीक्षेचा सराव होण्याच्या दृष्टीने अंतिम सत्र / वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची प्रचलित पध्दतीने सराव परीक्षा मंडळाची फेर परीक्षा होण्यापूर्वी, संस्था स्तरावर घेण्यांत यावी.**
- उपचारात्मक अध्यापनाकरिता उपस्थित विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत संस्थास्तरावर आवश्यकती दक्षता घ्यावी.

उपचारात्मक अध्यापनाची प्रक्रिया संस्थेने यशस्वीपणे राबविणे आवश्यक आहे व याबाबतची तपासणी बाहय अवेक्षण समितीमार्फत संस्था अवेक्षणाच्या वेळी करण्यात येणार आहे. उपचारात्मक अध्यापन प्रक्रिया राबविण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता —
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.

यांना कळविण्यात येते की, उपचारात्मक अध्यापनाबाबत संस्थांना मार्गदर्शन करावे तसेच सदर बाबतीत वेळोवेळी आढावा घेऊन मंडळास अहवाल सादर करावा.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दू.क्र.: ०२२-६२५४२११०/ १८८

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


**जा.क्र. मरातंशिमं/का-४०/वि.स./उ.प.२२/२०२२/ ९७८** **दिनांक :** 25 AUG 2022

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित संस्था.

**विषय: उन्हाळी परीक्षा २०२२ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण मान्यताप्राप्त अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील अंतिम सत्र / वर्षातील अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्ण विषयांच्या फेरपरीक्षेबाबत.**

**संदर्भ:** माननीय मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विधानमंडळ अधिवेशनात दिनांक २४/०८/२०२२ रोजी केलेले निवेदन.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विधान मंडळ अधिवेशनात दिनांक २४/०८/२०२२ रोजी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने उन्हाळी २०२२ परीक्षेमध्ये अंतिम सत्र / वर्षातील अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्ण विषयांची तसेच त्यांच्या असलेल्या उन्हाळी परीक्षा २०२२ मधील अनुत्तीर्ण बॅकलॉग विषयांची फेरपरीक्षा अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणुन मंडळाच्या प्रचलित पद्धतीने मंडळाने निर्धारीत केलेल्या परीक्षाकेंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे. त्याबाबत मंडळाशी संलग्नीत अखिल भारतीय मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्था, विद्यार्थी व त्यांचे पालक यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

**१) फेरपरीक्षेबाबतचे संक्षिप्त वेळापत्रक:**

| अ.क्र. | फेरपरीक्षेचा तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | परीक्षा अर्ज स्विकृती<br>विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरणे (Candidate fill)<br>विद्यार्थ्यांनी भरलेले परीक्षा अर्ज संस्थांनी निश्चित करणे. (Institute fill & Confirmation)<br>विभागीय कार्यालयांनी परीक्षा अर्ज निश्चित करणे. (RBTE confirmation) | <br>०५ ते ०७ सप्टेंबर, २०२२<br>०५ ते ०८ सप्टेंबर, २०२२<br>०५ ते ०९ सप्टेंबर, २०२२ |
| २ | विभागीय कार्यालयांनी परीक्षा अर्ज निश्चित करण्याचा अंतिम दिनांक | ०९ सप्टेंबर, २०२२ |
| ३ | परीक्षा ओळखपत्र व सिंटीग चार्ट प्रदर्शित करणे | १३ सप्टेंबर, २०२२ |
| ४ | प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा | १५ ते १७ सप्टेंबर, २०२२ |
| **५** | **लेखी परीक्षा** | **२१ सप्टेंबर ते ०४ऑक्टोबर, २०२२** |

२) **फेरपरीक्षेबाबत महत्वाच्या सुचना :**

i. ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा २०२२ करीता अंतिम सत्र / वर्षातील तसेच त्यांचे असलेले बॅकलॉग विषयांचा परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयामार्फत निश्चित केला होता, तसेच **उन्हाळी परीक्षा २०२२ चा निकाल Fail/WFLS/WFLY असा असेल अशाच विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांकरीताच फेरपरीक्षेची संधी देण्यात येणार आहे.**

ii. फेरपरीक्षेच्या संधीचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी मुद्दा क्र. १ मध्ये नमूद परीक्षा अर्ज वेळापत्रकानुसार नियमित परीक्षा शुल्कासह परीक्षा अर्ज संस्थास्तरावर भरुन विभागीय कार्यालयामार्फत निश्चित करणे अनिवार्य राहील. विभागीय कार्यालयांनी परीक्षा अर्ज निश्चित केलेले विद्यार्थीच फेरपरीक्षा देण्याकरीता पात्र राहतील.

iii. नियमित उन्हाळी परीक्षा २०२२ चा अंतिम सत्र / वर्षातील Reassessment चा निकाल दि. ०७ सप्टेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात येणार आहे. सदर निकाल जाहीर झाल्यानंतर फेरपरीक्षेकरीता परीक्षा अर्ज भरलेले विद्यार्थी ज्या विषयात उत्तीर्ण होतील अशा विषयांची फेरपरीक्षा घेण्यात येणार नाही, तसेच संबंधित विद्यार्थ्यांच्या फेरपरीक्षा Hall Ticket मधुन उत्तीर्ण झालेले विषय वगळण्यात येतील.

iv. दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता मंडळाच्या परीक्षाविषयक नियमावलीतील RG-१०(G) नुसार सोयीसुविधा देण्यात येतील. संस्थामार्फत अशा दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात.

v. उन्हाळी परीक्षा २०२२ दरम्यान गैरप्रकार प्रकरणी शिक्षा झालेले अंतिम सत्र / वर्षातील विद्यार्थी सदर फेरपरीक्षेकरीता पात्र असणार नाहीत.

vi. सर्व संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घ्यावी. परीक्षेदरम्यान गैरवर्तन झाल्यास मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील RG-१२ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबत आपल्या संस्थेतील विद्यार्थी, अध्यापक व इतर कर्मचारी यांना अवगत करावे.

vii. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे प्रथम सत्र १७ ऑगस्ट, २०२२ पासुन सुरु झालेले असुन हिवाळी २०२२ ही परीक्षासुद्धा माहे डिसेंबर, २०२२ मध्ये घेण्याबाबत मंडळाच्या शैक्षणिक वेळापत्रकान्वये घोषीत करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर शैक्षणिक कामकाज सुरळीत सुरु ठेवणे सुद्धा गरजेचे असल्याने सदर फेरपरीक्षेच्या निकालानंतर गुणपडताळणी, फोटोकॉपी व पुनर्गुणमुल्यांकनाची सुविधा देण्यात येणार नाही.

३) **अंतिम सत्र / वर्षाकरीता अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांचे आकलन सुयोग्यप्रकारे होण्याच्या दृष्टीने अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता विषयनिहाय अतिरीक्त अध्यापन वर्ग संस्थास्तरावर आयोजित करावे. सदर वर्गास विद्यार्थ्यांची उपस्थिती राहण्याकरीता संबंधित अध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे. मंडळामार्फत निर्धारित केलेल्या फेरपरीक्षा आयोजनापुर्वी संस्थास्तरावर अशा विद्यार्थ्यांकरीता सराव परीक्षा आयोजित करावी. या अनुषंगाने करावयाच्या सविस्तर कार्यवाहीबाबत मंडळाच्या दि. २४.०८.२०२२ च्या महत्वाचे परिपत्रकान्वये सर्व संस्थांना निर्देशित करण्यात आलेले आहे.**

तरी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत करुन द्याव्यात, तसेच विद्यार्थ्यांना फेरपरीक्षेबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे. फेरपरीक्षा मंडळाच्या नियमावलीप्रमाणे सुरळीतपणे पार पाडण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

**प्रत माहितीस्तव-**

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता -**

१) प्राचार्य, पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या स्वायत्त संस्था.

२) उपसचिव, म.रा.तं.शि.मं. विभागीय कार्यालय मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.